# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.)

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल केलेली तक्रार**

**क्र.रामाआ नाशिक/तक्रार क्र.७४८/२०२१/अहिल्यानगर मधील शास्तीचे प्रकरण**

| तक्रारदार | प्रतिवादी<br>जन माहिती अधिकारी |
|---|---|
| श्री.बाळासाहेब सोमा जाधव,<br>रा.मु.पो.टाकळीमियाँ,<br>ता.राहुरी, जि.अहिल्यानगर. | उपकुलसचिव (प्रशासन),<br>महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.<br>ता.राहुरी, जि.अहिल्यानगर. |

## विवेचन

तक्रारदार यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या तक्रार क्र.७४८/२०२१/अहिल्यानगर संदर्भात दि.२५/०३/२०२२ रोजी झालेल्या सुनावणीत आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत.

"द्वितीय अपिल सुनावणीवेळी कार्यरत जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कुलसचिव (प्रशासन), महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांनी आयोगाकडील द्वितीय अपिल क्र.१०३२/२०१९/अहिल्यानगर वरील दि.३१/०८/२०२१ रोजीच्या पारित आदेशास अनुसरुन माहिती पुरविली नाही. तसेच माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे दिसून येते. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या ७ दिवसांचे आंत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी."

२. आयोगाकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कुलसचिव (का.व्य.), महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी श्री.सागर सुरेश पेंडभाजे यांनी जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव (प्रशासन), महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांना दि.०१/०९/२०२२ च्या पत्रान्वये असे कळविले आहे की, विद्यापीठ आदेश दि.२७/११/२०२० अन्वये जन माहिती अधिकारी म्हणून उपकुलसचिव (प्रशासन), महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांना पदनिर्देशित केलेले आहे. द्वितीय अपिल क्र.१०३२/२०१९ च्या सुनावणीवेळी श्रीमती आशा पाडवी, उपकुलसचिव (प्रशासन) या जन माहिती अधिकारी म्हणून कार्यरत होत्या. सबब, विषयाधीन आदेशाच्या अनुषंगाने त्यांचा लेखी खुलासा प्राप्त करणे उचित होईल असे नम्र मत आहे. द्वितीय अपिल सुनावणीवेळी मी स्वत: जन माहिती अधिकारी म्हणून कार्यरत नसल्याने माहिती पुरविण्याचा प्रश्न नाही तसेच माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केलेली नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये कार्यवाही करण्यात येऊ नये ही नम्र विनंती.

तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव (प्रशासन), महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी श्रीमती आशा बा.पाडवी यांनी उपकुलसचिव (प्रशासन), महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांना दि.०६/०९/२०२२ च्या पत्रान्वये असे कळविले आहे की, मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक यांना यापूर्वी या प्रकरणाबाबत प्रशासनाच्या वतीने प्रशासनाकडे उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे सविस्तरपणे कळविण्यात आलेले आहे. सुलभ संदर्भाकरिता दि.०४/१०/२०२१ व दि.०७/१०/२०२१ च्या पत्राची छायांकित प्रत सोबत जोडण्यात येत आहे. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव (प्रशासन), महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी श्रीमती आशा बा. पाडवी यांनी आयोगास दि.०७/१०/२०२१ अन्वये दिलेल्या लेखी खुलाशात असे नमूद केले आहे की, आयोगाचे आदेश दि.२१/०९/२०२१ रोजी प्राप्त झालेले आहेत. त्या अनुषंगाने मला विद्यमान जन माहिती अधिकारी तथा

उपकुलसचिव (प्रशासन) म्हणून आपण दिलेल्या आदेशानुसार १५ दिवसांचे आंत अपिलार्थीस त्यांच्या दि.०४/१२/२०१८ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामूल्य पुरविण्याचे आदेशित केलेले आहे. आपण दिलेल्या आदेशात नमूद केल्यानुसार विनंतीपूर्वक कळविण्यात येते की, अपिलकर्ता श्री.बाळासाहेब सोमा जाधव यांच्या माहिती मिळणेबाबतच्या दि.०४/१२/२०१८ रोजीच्या अर्जातील मागणी केलेली माहिती उपकुलसचिव (प्रशासन) या कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याने सदरची माहिती प्राप्त करुन घेणेसाठी मानीव जन माहिती अधिकारी तथा कुलगुरु यांचे स्वीय सहाय्यक यांना सदर आदेशाची प्रत बजावण्यात आली होती. तथापि मानीव जन माहिती अधिकारी तथा कुलगुरु यांचे स्वीय सहाय्यक यांचेकडून खुलासा प्राप्त झालेला आहे. प्राप्त खुलाशात त्यांनी माहिती देण्यास असमर्थता व्यक्त केलेली असल्याने आपले अपिल सुनावणी आदेशात आदेशित केल्यानुसार अपिलकर्त्यास माहिती पुरविणे शक्य होणार नाही. जर मानीव जन माहिती अधिकारी यांनी या कार्यालयास माहिती उपलब्ध करुन दिली असती तर अपिलकर्त्यास या कार्यालयाकडून विनाविलंब माहिती पुरविण्यात आली असती. सदरची बाब आपले माहिती तथा अवलोकनार्थ सविनय सादर.

३. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, आयोगाने द्वितीय अपिल क्र.१०३२/२०१९ संदर्भात दि.३१/०८/२०२१ रोजी झालेल्या सुनावणीत दिलेल्या आदेशानुसार अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती पुरविण्यासाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव (प्रशासन), महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी श्रीमती आशा बा.पाडवी यांनी कुलगुरु यांचे स्वीय सहाय्यक श्री.र.पां.चोथे यांच्याकडून माहिती मागविली असल्याचे स्पष्ट होते. कुलगुरु यांचे स्वीय सहाय्यक श्री.र.पां.चोथे यांनी आयोगास दि.०४/१०/२०२१ अन्वये दिलेल्या खुलाशात असे नमूद केले आहे की, सदर माहिती ही तत्कालीन कुलगुरु डॉ.के.पी.विश्वनाथ यांच्याशी निगडीत असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८ (१) नुसार माहिती पुरविणेसाठी डॉ.के.पी.विश्वनाथ यांची सहमती असणे आवश्यक होते. कुलगुरु हे विद्यापीठाचे अंतिम सक्षम प्राधिकारी असून त्यांची माहिती पुरविण्याबाबत मान्यता न मिळाल्यामुळे मी माहिती पुरविण्यास असमर्थ ठरलो. डॉ.के.पी.विश्वनाथ यांचा कुलगुरु पदाचा कार्यकाळ दि.०४/११/२०२० रोजी संपून जवळजवळ ११ महिने कालावधी लोटला असून सदर कार्यालयीन वाहन वापर संदर्भात माहिती घेवून कोणतेही व्यापक जनहित साधत नाही. अपिलकर्त्यास सदरची व्यापक जनहित नसलेली माहिती दिल्यास माहिती अधिकार अधिनियम २००५ चा गैरवापर करणा-या प्रवृत्तीच्या व्यक्तींचा उपद्रव जास्त वाढण्याची शक्यता आहे. माझा माहिती अधिकार कायदा आणि आपले आदेशाचे उल्लंघन करण्याचा कोणताही हेतू नसून मी कायद्याचे पालन करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केलेले आहेत. मी वरील सर्व खुलाशाच्या अनुषंगाने विनंती करतो की, अपिलकर्त्यास निशुल्क माहिती देण्याच्या आपले आदेशाचा कृपया पुर्नविचार करावा ही विनंती. यावरुन असे स्पष्ट होते की, अपिलकर्ता यांनी मागणी केलेली माहिती आयोगाच्या आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव (प्रशासन), महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी श्रीमती आशा बा.पाडवी यांना उपलब्ध करुन देण्याऐवजी हेतुपुरस्सर टाळाटाळ केली आहे. तसेच आयोगाने अपिलकर्त्यास विनामूल्य माहिती पुरविण्याच्या आदेशाचा पुर्नविचार करावा अशी कुलगुरु यांचे स्वीय सहाय्यक श्री.र.पां.चोथे यांनी केलेली विनंती म्हणजे आयोगाच्या आदेशाचे पालन न करण्याची त्यांची वृत्ती दिसून येते. त्यामुळे याप्रकरणी आयोगाने द्वितीय अपिल क्र.१०३२/२०१९ संदर्भात ३१/०८/२०२१ रोजी दिलेल्या आदेशाचे पालन केले नाही म्हणून तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव (प्रशासन), महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी श्रीमती आशा बा.पाडवी या जबाबदार नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द कार्यवाही करणे योग्य होणार नाही. याप्रकरणी आयोगाने दिलेल्या आदेशानुसार मानीव जन माहिती अधिकारी तथा कुलगुरु यांचे स्वीय सहाय्यक श्री.र.पां.चोथे यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अपिलकर्त्यास आयोगाच्या आदेशानुसार माहिती पुरविता आलेली नसल्याचे स्पष्ट होते. सबब, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ५ (४) व ५ (५) अन्वये माहिती अर्जाच्या अनुषंगाने वाजवी सहाय्य करण्याची जबाबदारी कुलगुरु यांचे स्वीय सहाय्यक श्री.र.पां.चोथे यांची असून त्यांनी सहाय्य

केल्याचे दिसून येत नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव (प्रशासन), महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी श्रीमती आशा बा.पाडवी यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये प्रस्तावित शास्तीची कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

२) तत्कालीन मानीव जन माहिती अधिकारी तथा कुलगुरु यांचे स्वीय सहाय्यक श्री.र.पां.चोथे यांच्याविरुध्द आयोगाच्या मते उपरोक्त विवेचनाच्या पार्श्वभूमीवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) अन्वये रु.१०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार मात्र) शास्तीची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी ता.राहुरी, जि.अहिल्यानगर यांनी त्यांच्या वेतनातून समान २ मासिक हप्त्यांत कपात करुन सदर रकमेचा भरणा **"००७०, इतर प्रशासनिक सेवा, (०१) (१८) माहितीचा अधिकार दंड व शुल्क (००७०-०७८९)"** या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करावी व सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर त्याबाबत आयोगास अवगत करावे.

३) प्रस्तुत तक्रार क्र.७४८/२०२१/अहिल्यानगर अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग

( भूपेन्द्र गुरव )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :-

प्रत :- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी ता.राहुरी, जि.अहिल्यानगर.

जा.क्र. 2094 , दिनांक :- 18 MAR 2026